**शपथेवर सरतपास श्री यु. व्हि. देशपांडे अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे :—**

०३. आता मला माझे शपथपत्र नि.क्र. सी—१७ दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**उलट तपासणी श्री. व्ही. एम. शिकारे प्रतिनिधी अर्जदारातर्फे** :—

०४. हे म्हणने खरे नाही की कथीत कमी दराच्या तिकीटांवर प्रवास करणा—या प्रवाशांचे बयाण मी घेतले नाही. आता मला नि. यु—०९ वर घेतलेले कथीत प्रवाशांचे बयाण दाखवीले सदर बयाणावर माझी समक्ष म्हणून सही नाही. आता मला प्रकरणामध्ये दाखल इन्सपेक्शन रिपोर्ट दाखवीला. त्यावर सुध्दा माझी सही नाही. सदर इन्सपेक्शन रिपोर्टवर ६०/— रुपये व ९०/— रुपये अशा दोन तिकीटा जोडलेल्या आहे.

प्र कथीत प्रवाशांकडून १२०/— रुपये वसूल केल्यानंतर तुम्ही १५०/— रुपयाच्या तिकीटा का फाडल्या व सदर अतिरिक्त ३०/— रुपये कथीत प्रवाशांकडून वसूल केले का ?

ऊ गोंडपीपरी ते गोजीली ची १५/— रुपये तिकीट असल्यामुळे ६ तिकीट गोंडपीपरी ते गोजीली एकुण ९०/— रुपयाचे काढले. कथीत प्रवाशांकडून अतीरीक्ती ३०/— रुपये आम्ही वसूल केले नाही.

सदर अतीरीक्त ३०/— रुपयाचा भुदंड हा वाहकाने भरला. गोंडपीपरी ते गोजीली याची तिकीट १५/— रुपये आहे व अतीरीक्त ३०/— रुपयाचा भुदंड वाहकाकडून भरुन घेतल्याबाबत मी माझे पुराव्यात नमूद केले नाही. एका स्टेज चे म्हणजे ६ की.मी. चे प्रवासभाडे १०/— रुपये आहे. आता मला सदर प्रकरणामध्ये दाखल बस तपासणी अहवाल दाखवीला त्यामध्ये विना तिकीट प्रवासी बसण्याचे ठिकाण ते बस तपासणी स्थळ या मधील अंतर १२ कि.मी. नमूद केले आहे. हे म्हणने खरे आहे की सदर अहवालामध्ये मी असे नमूद केले आहे की विना तिकीट प्रवाशी बसला त्याठीकाणी बसलेले ५३ एकुण प्रवासी.

प्र तुम्ही दिलेल्या अहवालामध्ये क्रमांक ५ अपराधाचा संक्षेप यामध्ये आपण सदर प्रवाशाना कमी दराची तिकीट दिल्याचे नमूद केलेले असून क्रमांक ७ वर विना तिकीट प्रवाशी असे नमूद केलेले आहे तर कथीत प्रवाशी विना तिकीट होते की कमी दराच्या तिकीटावर प्रवास करीत होते ?

ऊ सदर प्रवाशी हे विना तिकीट प्रवास करीत होते व अर्जदाराने आम्हाला पाहून त्याना कमी दराची तिकीटे दिली.

अर्जदाराने आम्हाला पाहून कथीतप्रवाशाना कमी दराची तिकीट दिली याबाबत आम्ही ईतर प्रवााशांचे बयाण नोंदवून घेतले नाही. गोंडपीपरी ते गोजीली या मध्ये १२ कि.मी. अंतर आहे व गोंडपीपरी ते सोनोली यामधील अंतर १३ कि. मी. आहे. हे म्हणने खरे आहे की १३ कि.मी अंतराचे भाडे हे अडीच स्टेज घ्यायला पाहिजे. सहा प्रवााशाचे अडीच स्टेजचे भाडे कीती होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणने खरे आहे की वाहकाची रा.प. रोकड बसतपासणीच्या वेळेस मी तपासली नाही. हे म्हणने खरे नाही की मी खोटा पुरावा दाखल केला असून खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण. माझे समक्ष

उलटतपास करीता तहकुब. स्वा/–

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश
दि. २८/०२/२०२५. कामगार न्यायालय, चंद्रपुर.